BACK

# NPS - स्वावलंबन आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांसाठी पेन्शन शक्य आहे

## NPS - स्वावलंबनची वैशिष्ट्ये

- प्रत्येक वर्गणीदाराला त्याचे छायाचित्र, नाव आणि स्वाक्षरी असलेले, "प्रान कार्ड" नावाचे एक ओळखपत्र मिळेल. या कार्डद्वारे तो/ती NPS - स्वावलंबनचा सदस्य असल्याची सिद्ध होईल.
- प्रत्येक वर्गणीदार किमान ₹100 दर महा जमा करू शकतो. मासिक अंशदानाची कोणतीही निर्धारित रक्कम नाही. वर्गणीदाराला जेव्हा शक्य असेल आणि त्याच्याकडे आवश्यक रक्कम उपलब्ध असेल तेव्हा, तो अंशदान जमा करू शकतो.
- ₹1,000 चा स्वावलंबन लाभ मिळवण्यासाठी - वर्गणीदाराने किमान ₹1,000 आणि कमाल ₹12,000 प्रत्येक वर्षात जमा केले पाहिजेत.
- ही रक्कम पीएफआरडीएद्वारे मान्यताप्राप्त "ॲग्रिगेटर्स" नावाच्या संघटनांद्वारे गोळा केली जाईल.
- NPS - स्वावलंबन योजनेच्या अंशदानांचे संकलन करण्यासाठी मान्यताप्राप्त ॲग्रिगेटर्सची यादी PFRDAची वेबसाईटः www.pfrda.org.in वर प्रदर्शित केलेली आहे. ॲग्रिगेटर पैसे गोळा करेल, आणि वर्गणीदाराला एक पावती देईल. ॲग्रिगेटर दर शुक्रवारी (सिस्टीममध्ये अपलोडींग करून) वर्गणी एका निर्धारित NPS - स्वावलंबन बँक खात्यात जमा करेल.
- सद्यस्थितीत, NPS - स्वावलंबन योजना सरकारी नोकरांसाठी अनिवार्य असल्याप्रमाणेच आहे, म्हणजे सरकारी रोख्यांमध्ये 55%, कॉर्पोरेट बाँड्समध्ये 40%, पैसा बाजारपेठेत 5% आणि भांडवलांमध्ये 15% पर्यंत.
- वर्षातून एकदा, संपूर्ण अंशदानाचे स्टेटमेंट ऑफ अकाऊंट (SOT) आणि जमा पैशाचे बाजारपेठ मूल्य ॲग्रिगेटरला पाठवले जाईल जो ते वर्गणीदारांना वितरित करेल.
- निकासाच्या तरतुदीः
  - अ) सामान्य रक्कम काढणेः वयाच्या 60 व्या वर्षी, सदस्य 60% पर्यंत पेन्शन एकरक्कमी काढू शकतो आणि मासिक पेन्सन (ॲन्युईटी) पुरविण्यासाठी किमान 40% पेन्शन संपत्ती वापरली जाईल.
  - ब) मुदतपूर्व रक्कम काढणेः निकास 60 वर्षे वयाच्या पूर्वी असेल तर मासिक पेन्शन (ॲन्युईटी) पुरवण्यासाठी पेन्शनच्या किमान 80% रक्कम वापरली जाईल.

    पेन्शन मालमत्तेवर ₹1,000 दरमहाच्या पेन्शन (ॲन्युईटी) उत्पन्न येत नसेल तर वार्षिक तत्वावरील पेन्शन मालमत्तेची टक्केवारी वाढवली जाईल जेणेकरून पेन्शनची रक्कम ₹1,000 दरमहा बनले, अन्यथा संपूर्ण पेन्शन मालमत्ता मासिकी पेन्शन ॲन्युईटी) साठी वापरली जाईल.
  - क) वर्गणीदाराच्या मृत्युप्रसंगी रक्कम काढणेः वर्गणीदाराचा मृत्यु झाल्यास, संपूर्ण रक्कम त्याच्या/तिच्या वारसांना, तत्काळ, निधीच्या कोणत्याही भागाची ॲन्युईटी न काढता घेता येईल.

### सदर योजनेचा खर्चः

- NPS - स्वावलंबन खात्यामध्ये सदस्याला वर्षभरातील सर्व व्यवहारांचा तपशील दिला जातो. प्रत्येक वर्गणीदाराचे एक स्वतंत्र वैयक्तिक निवृत्ती खाते राहील. या खात्यामध्ये वर्षभरात केलेली गुंतवणूक आणि निधीचे नक्त मालमत्ती मूल्य दर्शवले जाईल. प्रवेश घेतेवेळी, सदस्याने प्रान कार्ड प्राप्त करण्यासाठी ₹35 एकवेळेची किंमत भरायची आहे.
- दरवर्षी, नोंदी ठेवण्याच्या खर्चापोटी ₹70 नक्त मालमत्ता मूल्यातन वजा केले जातील. दरवर्षी बारा व्यवहार मोफत राहतील.

### ग्राहक आधार

- एक **केंद्रीय तक्रार व्यवस्थापन यंत्रणा (CGMS)** असेल ज्याखाली कोणताही वर्गणीदार त्याची/तिची तक्रार त्याच्या/तिच्या ॲग्रिगेटरद्वारे दाखल करू शकतो किंवा एक लेखी तक्रार PFRDA किंवा CRA कडे पाठवू शकतो. या तक्रारीवर PFRDA आणि CRA लक्ष ठेवतील.
- आपण केलेल्या अंशदानाची योग्य नोंद केलेली आहे हे तपासण्याकरिता आपले खाते ऑनलाईन पाहण्यासाठी सदस्य ॲग्रिगेटरशी देखील संपर्क साधू शकतो.

**तुम्ही किमान ₹1,000/- आणि कमाल ₹12,000/- तुम्ही योगदान केल्यास "स्वावलंबन" योजना तुमच्या खात्यात दरवर्षी ₹1,000/- जमा करते जेणेकरून तुम्ही तुमचा पेन्शन निधी उभारू शकता**

***आजच सहभागी व्हा वाट पाहू नका! विलंब करू नका!***

*वर्गणीदार होण्यापूर्वी कृपया ऑफर दस्तऐवज आणि योजनेचा तपशील काळजीपूर्वक वाचा.*

FRONT

# राष्ट्रीय पेन्शन यंत्रणा (NPS) - सर्वांसाठी वृद्धापकाळातील उत्पन्न सुरक्षेची खात्री

## पेन्शन कशासाठी?

**संपूर्ण जीवनभर, तुम्ही काम केलं आहे, तुम्ही स्वयंपूर्ण राहिले आहात, तुम्ही स्वाभीमानी आणि स्वतंत्र राहिले आहात!!!**
**तुम्ही आज तुमच्या पेन्शनसाठी बचत केली;**
**तर तुम्ही काम करणे बंद कराल तेव्हा तुम्हाला मासिक उत्पन्न मिळेल.**

तुमच्या NPS खात्यामध्ये तुम्ही केलेले अंशदान आणि **स्वावलंबन योजनेअंतर्गत** सरकारडून मिळालेला आधार यांच्या आधारे मासिक उत्पन्न मिळण्याची खात्री NPS द्वारे केली जाते.

**NPS - स्वावलंबन तुमच्यासाठी आणि सर्वांसाठी आहे!!!**

### NPS म्हणजे काय?

NPS हा भारत सरकार आणि PFRDA यांचा एक पुढाकार आहे. NPS आरंभी सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सुरु करण्यात आली, आणि नंतर ती भारताच्या सर्व नागरिकांना लागू करण्यात आली. समाजातील अल्प उत्पन्न मिळवणारे आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गांना वृद्धापकाळात उत्पन्न सुरक्षा देण्याची गरज ओळखून NPS स्वावलंबन योजना सुरू करण्यात आली.

### स्वावलंबन म्हणजे काय?

'वित्तीय समावेश' या दिशेने सरकारच्या पुढाकाराचा भाग म्हणून, अर्थमंत्र्यांनी सहभागींना त्यांच्या वृद्धापकाळासाठी बचत सुरू करण्याकरिता प्रोत्साहन म्हणून "स्वावलंबन"ची घोषणा केली. भारत सरकार देखील NPS करिता ₹1,000 दरवर्षी अंशदान करेल 2012-13 मध्ये पाच वर्षांसाठी उघडलेल्या स्वावलंबन खात्यांमध्ये.

(तपशिलासाठी मागील बाजू पाहा)

*ॲग्रिगेटरचे नाव आणि पत्ता*

***NPS - पेन्शन नव्हे हा प्रान आहे.....***

Language : MARATHI